

# मुंबई मेट्रो ३ ची यशस्वी भुयारी ट्रायल रन

## १० स्थानकांचा पहिला टप्पा डिसेंबरपासून

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्रातील पहिली भूमिगत मेट्रो मार्गिका असलेल्या आरे ते कफ परेड या मेट्रो ३ मार्गिकेवरील कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. पहिल्या टप्प्यातील काही स्थानके जवळपास तयार असून शनिवारी मेट्रो ३ ची एमआयडीसी ते सांताक्रूझ दरम्यान यशस्वी ट्रायल रन घेण्यात आली. १० स्थानकांचा पहिला टप्पा डिसेंबरपासून सुरू करण्याचे उद्दिष्ट एमएमआरडीएने डोळ्यासमोर ठेवले असून मुंबईच्या भुयारातून मुंबईकरांना येत्या काळात प्रवास करता येणार आहे.

### सरकते जिने आणि पंखे

- मेट्रो स्टेशनवर प्रवाशांना जाण्यासाठी सरकते जिने बांधण्यात आले आहेत तसेच प्रवाशांना उकाडा जाणवू नये, ताजी हवा मिळावी यासाठी जमिनीखाली पंखे बसविण्यात आले आहेत.
- सुरक्षिततेसाठी फलाट आणि रुळ यादरम्यान 'प्लॅटफॉर्म स्क्रीन डोअर्स' पद्धतीने मोठी काच बसविण्यात आली आहे.
- या काचेला असलेले दरवाजे केवळ गाडी आल्यावरच उघडले जातात.

### ही आहेत स्थानके

आरे, सीप्झ, एमआयडीसी, मरोळ नाका, विमानतळ टर्मिनल २, सहार रोड, देशांतर्गत विमानतळ, सांताक्रूझ, विद्यानगरी व बीकेसी या स्थानकांचा पहिल्या टप्प्यात समावेश असून एकूण नऊ गाड्या या टप्प्यात चालविल्या जाणार आहेत.

### 'ही' मार्गिका सुरु करण्याची हालचाल

डिसेंबर २०२३ पासून मेट्रो ३ ही मार्गिका सुरु करण्यासाठी एमएमआरडीएने तयारी केली त्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनची स्थापना करण्यात आली. या मेट्रोचा पहिला टप्पा जवळपास पूर्ण होत आला आहे.



### ३३ किमी लांबीची मार्गिका

१ दक्षिण आणि उत्तर मुंबईला जोडणारी मेट्रो ३ ही मार्गिका ३३ किमी लांबीची असून या मार्गिकेत २७ स्थानके आहेत. त्यापैकी २६ भूमिगत व एक स्थानक जमिनीवर आहे. मार्गिकेचा पहिला टप्पा आरे ते बीकेसी डिसेंबर २०२३पासून सुरू करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली असून त्यादृष्टीने पहिली चार स्थानके अंतिम टप्प्यात आहेत.

२ सर्व भूमिगत स्थानके काही ठिकाणी २० मीटर खोलीपर्यंत बांधली आहेत. प्रत्येक स्थानकाचा पहिला माळा हा जमिनीपासून सरासरी १२ ते १५ मीटर खोलीवर आहे. सीप्झ, एमआयडीसी, मरोळ नाका व विमानतळ टर्मिनल २ या उत्तरेकडील चार स्थानकांची उभारणी सुद्धा याच पद्धतीने करण्यात आली आहे.